ePaper

**अनिल अंबानींचा पाय खोलात, हायकोर्टाने दिला दणका, महत्त्वाची याचिका फेटाळली**




| वर्ष - 9 । अंक -42 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

www.mahaenews.com । शनिवार, दि. 4 ऑक्टोबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत


- विद्यर्थाची सामन्यावर घट्ट पकड!
- निवृत्तीचा नव्हे, कणखरतेचा विचार!
- ट्रम्प यांनी हमासला दिली रविवारपर्यंत मुदत
- राजीव प्रताप यांची हत्या की अपघात?


### रिक्षाला धडक दिल्याने अपघात | नृत्यांगणा गौतमी पाटीलच्या अडचणीत वाढ

# गौतमी पाटीलला अटक होणार?

## पुणे पोलिसांकडून नोटीस, अपघात प्रकरणात मोठा ट्विस्ट



। पुणे । प्रतिनिधी ।
महाईन्यूज

**नृत्यांगना गौतमी पाटील हिच्या अडचणी वाढवणारी बातमी समोर येत आहे. पुणे पोलिसांनी अपघात प्रकरणी गौतमी पाटील हिला नोटीस पाठवली आहे. गौतमी पाटील हिच्या वाहनाने रिक्षाला धडक दिली होती. या अपघातात रिक्षाचालक गंभीर जखमी झाला होता. संबंधित वाहन हे गौतमी पाटीलच्या नावाने असल्याची माहिती आहे. त्यामुळे पुणे पोलिसांनी तपासासाठी तिला नोटीस बजावली आहे. अपघात प्रकरणी चौकशी करण्यासाठी सिंहगड रोड पोलिसांनी गौतमीला नोटीस बजावली आहे.**

नृत्यांगना गौतमी पाटील हिच्या अडचणी वाढवणारी बातमी समोर येत आहे. अपघातग्रस्त रिक्षा चालकाच्या नातेवाईकांनी गौतमी पाटील हिला अटक करण्याची मागणी केली आहे. त्यामुळे या प्रकरणात आता ट्विस्ट येताना दिसत आहे. पुण्यातील वडगाव बुद्रुक परिसरात मंगळवारी पहाटे अपघाताची घटना घडली होती. या प्रकरणी पुणे पोलिसांनी गौतमी पाटील हिच्या गाडी चालकाला अटक केली होती. दरम्यान, ज्या वाहनाने रिक्षाला धडक दिली ते वाहन गौतमी पाटीलच्या नावाने असल्यामुळे सिंहगड रोड पोलिसांनी तिला नोटीस पाठवली आहे. या अपघात प्रकरणी चौकशीसाठी हजर राहावे असे या नोटीसमध्ये बजावण्यात आले असल्याची माहिती पोलिसांनी दिली. सामाजी विठ्ठल मरगळे असे जखमी झालेल्या रिक्षा चालकाचे नाव आहे. अपघातानंतर कारचालक फरार झाला होता. मात्र सीसीटीव्ही फुटेज तपासून पोलिसांनी 30 वर्षीय वाहन चालकाला अटक केली आहे. पुण्यातील सिंहगड पोलीस स्टेशन समोर शिवसेना ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांनी गौतमी पाटील विरोधात आंदोलन केलं. गौतमी पाटीलचे राज्यातील शो बंद करण्यासाठी उद्धव ठाकरेंच्या शिवसैनिकांनी सिंहगड पोलीस ठाण्यासमोर ठिय्या आंदोलन केलं. या अपघातातील जखमी ऑटो रिक्षा चालकावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. रिक्षा चालकावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. पोलिसांनी गौतमीला चौकशीसाठी 30 सप्टेंबरला बोलावल्याची माहिती होती. पण ती चौकशीसाठी न येता शो करत महाराष्ट्रात फिरत असल्याने ठाकरे गटाची शिवसेना आक्रमक झाली. ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांनी ठिय्या आंदोलन केलं. यानंतर आता पोलिसांनी पुन्हा नोटीस पाठवल्याची माहिती समोर येत आहे.

### 'गौतमीला अटक करा', पीडित कुटुंबियांची मागणी

दुसरीकडे अपघातग्रस्त रिक्षा चालकाच्या कुटुंबियांनी गौतमी पाटील हिला अटक करण्याची मागणी केली आहे. तसेच या अपघाताचं सीसीटीव्ही फुटेज द्या, अशी मागणी रिक्षा चालकाच्या कुटुंबियांनी केली आहे. "ती गाडी जिथून स्टार्ट झाली तिथून ती कुठे थांबली. गाडीत कोण होतं, कोण कुठे उतरलं, याचे रेकॉर्ड्स आमच्यापर्यंत यावेत. आम्हाला हे पाहायचं आहे. आम्हाला पूर्णपणे संशय आहे की, गाडीचा चालक बदलला गेला आहे. गाडी मालक गौतमी पाटीलला आतापर्यंत का अटक झाली नाही? आपलं प्रशासन का एवढं थंड आहे?", असे सवाल रिक्षा चालकाच्या नातेवाईकांनी केला आहे.

### चंद्रकांत पाटलांचा थेट DCP ला फोन

नृत्यांगना गौतमी पाटीलच्या कारमुळे झालेल्या अपघात प्रकरणी राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील आक्रमक झाले आहेत. सदर प्रकरणी दोषींवर कठोर कारवाई करावी अशा सूचना पाटील यांनी पोलीस अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. त्यामध्ये रिक्षाचालक मरगळे हे गंभीर जखमी झाले असून, त्यांच्यावर दीनानाथ रुग्णालयात उपचार सुरु आहेत.



## चंद्रकांत पाटील नेमकं काय म्हणाले?

"त्या गौतमी पाटीलला उचलायचं की नाही? ती गाडी कुणाची तरी आहे की नाही? हा जो रिक्षावाला सीरिअस आहे, चला तुम्ही म्हणताय गौतमी पाटील गाडीत नव्हती. पण कुणीतरी गाडी चालवत होतं ना? की भूत गाडी चालवत होतं? जो गाडी चालवत होता त्याला पकडायला लागेल ना. पकडलं का, केस दाखल केली का. बरं. मग तो आता कुठे आहे? मग ती गाडी कुठे आहे? गाडी जप्त करुन टाका. गाडीची जी मालकीण गौतमी पाटील आहे तिला नोटीस देऊन टाका. त्या बिचाऱ्याची मुलगी समोर येऊन बसली आहे. तिला म्हणावं, तू असशील गौतमी पाटील वगैरे. पण त्या बिचाऱ्याचा खर्च तरी कर म्हणावं. तुम्ही लक्ष द्या", अशी सूचना चंद्रकांत पाटील यांनी डीसीपींना दिली.

वाहनचालकांना त्रास

## पोलिसांसह विविध यंत्रणांची सिद्धता तपासण्यात आली

# शहरात तीन ठिकाणी मॉकड्रिल!

## वाहतूक पर्यायी मार्गाने वळविली

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुणे पोलिसांकडून शुक्रवारी अचानक तीन ठिकाणी ‘मॉकड्रिल’ घेण्यात आले. डेक्कन जिमखाना, लष्कर भागातील महात्मा गांधी रस्ता, तसेच विश्रांतवाडीतील एका लष्करी संशोधन संस्थेच्या परिसरात पोलिसांसह विविध यंत्रणांनी सराव केला. या सरावाच्या माध्यमातून पोलिसांसह विविध यंत्रणांची सिद्धता तपासण्यात आली.**



डेक्कन जिमखाना, महात्मा गांधी रस्ता, तसेच विश्रांतवाडी भागातील एका लष्करी संशोधन संस्थेच्या परिसरात अनुचित घटना घडली असून, तेथे बॉम्बस्फोट घडल्याची माहिती विविध यंत्रणांना देण्यात आली. डेक्कन जिमखाना भागातील नामदार गोपाळकृष्ण गोखले चौक ते गरवारे भुयारी मार्ग परिसर, महात्मा गांधी रस्ता परिसरात त्वरित पुणे पोलिसांचे शीघ्र कृती दल (क्वीक रिस्पॉन्स टिम), राज्य दहशतवाद विरोधी पथक (एटीएस), केंद्रीय गुप्तचर यंत्रणा, अग्निशमन दल, बॉम्ब शोधक नाशक पथक (बीडीडीएस), आरोग्य विभागाचे पथक घटनास्थळी दाखल झाले. हा भाग तातडीने निर्मनुष्य करण्यात आला. वाहतूक पोलिसांनी त्वरित डेक्कन जिमखाना, महात्मा गांधी रस्ता, विश्रांतवाडी भागातील वाहतूक पर्यायी मार्गाने वळविली. अचानक वाहतूक वळविण्यात आल्याने वाहनचालकांना त्रास सहन करावा लागला. डेक्कन जिमखाना परिसरातील भांडारकर रस्ता, प्रभात रस्ता, कर्वे रस्ता परिसरातील वाहतूक विस्कळीत झाली. वाहतूक अचानक बंद करण्यात आल्याने कोंडी झाली. वाहतूक पोलिसांनी वाहनचालकांना पर्यायी मार्गाचा वापर करण्याचे आवाहन केले. त्यानुसार वाहने पर्यायी मार्गाने वळविण्यात आल्यानंतर प्रभात रस्ता, भांडारकर रस्ता परिसरातील गल्ली बोळात कोंडी झाली. दुपारी दोन ते चारपर्यंत शहरातील तीन महत्वाच्या ठिकाणी पोलिसांसह विविध यंत्रणांनी सराव केला. नागरिकांनी सुरुवातीला रस्ते का बंद केले, याबाबतची माहिती मिळाली नाही. पोलिसांनी सराव केल्याचे समजताच नागरिकांनी सुटकेचा निश्वास सोडला.शहरातील महत्वाच्या ठिकाणी पुणे पोलिसांनी अचानक ‘मॉकड्रिल’ केले. त्या माध्यमातून पोलिसांसह विविध यंत्रणांनी सराव केला. नागरिकांना थोडा त्रास झाला.

### पर्यायी मार्गा वापरण्याचे आवाहन

पोलिसांनी सराव केल्याचे समजताच नागरिकांनी सुटकेचा निश्वास सोडला.शहरातील महत्वाच्या ठिकाणी पुणे पोलिसांनी अचानक ‘मॉकड्रिल’ केले. त्या माध्यमातून पोलिसांसह विविध यंत्रणांनी सराव केला. नागरिकांना थोडा त्रास झाला. मात्र, अशा प्रकाराच्या सरावाची माहिती आधीच जाहीर करण्यात येत नाही. अचानक करण्यात आलेल्या सरावाच्या माध्यमातून पोलिसांसह विविध यंत्रणांची सिद्धता तपासली जाते.

मात्र, अशा प्रकाराच्या सरावाची माहिती आधीच जाहीर करण्यात येत नाही. अचानक करण्यात आलेल्या सरावाच्या माध्यमातून पोलिसांसह विविध यंत्रणांची सिद्धता तपासली जाते. डेक्कन जिमखाना, महात्मा गांधी रस्ता, तसेच विश्रांतवाडी भागातील एका लष्करी संशोधन संस्थेच्या परिसरात अनुचित घटना घडली असून, तेथे बॉम्बस्फोट घडल्याची माहिती विविध यंत्रणांना देण्यात आली. डेक्कन जिमखाना भागातील नामदार गोपाळकृष्ण गोखले चौक ते गरवारे भुयारी मार्ग परिसर, महात्मा गांधी रस्ता परिसरात त्वरित पुणे पोलिसांचे शीघ्र कृती दल (क्वीक रिस्पॉन्स टिम), राज्य दहशतवाद विरोधी पथक (एटीएस), केंद्रीय गुप्तचर यंत्रणा, अग्निशमन दल, बॉम्ब शोधक नाशक पथक (बीडीडीएस), आरोग्य विभागाचे पथक घटनास्थळी दाखल झाले. हा भाग तातडीने निर्मनुष्य करण्यात आला. वाहतूक पोलिसांनी त्वरित डेक्कन जिमखाना, महात्मा गांधी रस्ता, विश्रांतवाडी भागातील वाहतूक पर्यायी मार्गाने वळविली. अचानक वाहतूक वळविण्यात आल्याने वाहनचालकांना त्रास सहन करावा लागला. डेक्कन जिमखाना परिसरातील भांडारकर रस्ता, प्रभात रस्ता, कर्वे रस्ता परिसरातील वाहतूक विस्कळीत झाली.त्यानुसार वाहने पर्यायी मार्गाने वळविण्यात आल्यानंतर प्रभात रस्ता, भांडारकर रस्ता परिसरातील गल्ली बोळात कोंडी झाली.


# तर समाज तुम्हाला माफ करणार नाही

## लक्ष्मीकांत देशमुख यांचे महापालिकेच्या अधिकाऱ्यांना खडे बोल

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**‘मुंबई, पुणे यासारख्या शहरातच मराठी भाषेची सर्वाधिक गळचेपी होत आहे. सर्व स्तरातील बहुतांश विद्यार्थी इंग्रजी माध्यमात शिकत आहेत. महापालिकेच्या नव्वद टक्के अधिकारी, कर्मचाऱ्यांची मुले मराठी शाळेत शिकत नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. महापालिकेच्या शाळा बंद पडत असून, खासगी शाळांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे,’ अशी खंत अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख यांनी व्यक्त केली.**



‘उड्डाणपूल बांधा किंवा बांधू नका. रस्त्यांवरच्या खड्डयांपेक्षा शिक्षणाला प्राधान्य देणे गरजेचे आहे. आमच्या मुलांना चांगले शिक्षण द्या. त्यासाठी आम्ही कर भरतो. तुम्ही जर चांगले शिक्षण दिले नाही, तर समाज तुम्हाला माफ करणार नाही.’ असे खडे बोल त्यांनी महापालिकेच्या अधिकाऱ्यांना सुनावले.पुणे महानगरपालिकेच्या सांस्कृतिक केंद्र आणि शिक्षण विभागाच्या वतीने आयोजित ‘जागर अभिजात मराठीचा’ या कार्यक्रमात देशमुख बोलत होते. ज्येष्ठ बालसाहित्यिक राजीव तांबे, ल. म. कडू, डॉ. संगीता बर्वे यांच्यासह महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे, उपायुक्त किशोरी शिंदे, सांस्कृतिक विभागाचे प्रमुख राजेश कामठे, माजी नगरसेविका माधुरी सहस्रबुद्धे, कामगार विभाग आयुक्त नितीन केंजळे, उपायुक्त वसुंधरा बारवे, प्रशासकीय अधिकारी सुनंदा वाखारे, आशा उबाळे, संवाद पुणेचे सुनील महाजन, रत्ना दहिवेलकर या वेळी उपस्थित होत्या.देशमुख म्हणाले, ‘महापालिकेची प्रत्येक शाळा ‘मॉडेल स्कूल’ झाली पाहिजे. महापालिकेच्या शाळेत शहरातील बहुतांश गरीब विद्यार्थी शिक्षण घेत असतात.

### पुणे पालिका ही श्रीमंत महापालिका

अभिजात मराठी भाषा टिकवायची असेल, तर या मुलांनाही चांगले मराठी लिहिता, वाचता यायला हवे. कला-क्रीडा आणि साहित्य, सांस्कृतिक कार्यक्रम अशा उपक्रमांमध्ये मुले सहभागी होतात का, हे पाहायला हवे. त्यासाठी शिक्षकांना प्रेरणा आणि आवश्यक ती सर्व साधने उपलब्ध करून द्यायला हवीत.’‘पुणे महापालिका ही श्रीमंत महापालिका आहे.

एक हात मदतीचा — समर्थक, पदाधिकारी यांच्या बैठकीत केला संकल्प

# पूरग्रस्त 50 गावांची दिवाळी गोड करण्याचा निर्धार!

## भाजपा आमदार महेश लांडगे यांनी जपली मानवता

।पिंपरी चिंचवड। प्रतिनिधी : महाईन्यूज

**मराठवाडा आणि अन्य जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे शेतकरी-कष्टकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. अक्षरश: ओला दुष्काळ पडला आहे. त्यामुळे या भागातील नागरिकांना "एक हात मदतीचा" देण्यात येणार आहे. मराठवाड्यातील 50 पूरग्रस्त गावांतील नागरिकांची दिवाळी गोड करण्याचा निर्धार करण्यात आला आहे..**



> देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पार्टीच्या प्रत्येक कार्यकर्त्याने 'सेवा पंधरवडा' साजरा केला. मराठवाडा आणि अन्य जिल्ह्यात महापुरामुळे शेतकरी-कष्टकरी यांचे अपार नुकसान झाले. शेवटच्या घटकापर्यंत मदतकार्य पोहोचवता यावे. याकरिता आम्ही पिंपरी-चिंचवडकरांच्या लोकसहभागातून 'एक हात मदतीचा' उपक्रम हाती घेतला आहे. जीवनाश्यक वस्तुंचे वितरण, गोधन दान आणि त्यानंतर गरजुंना शैक्षणिक मदत अशी तीन टप्प्यांमध्ये मदतकार्य उभा करण्याचा संकल्प आहे. आपल्या योगदानामुळे किमान एका पूरग्रस्त कुटुंबाची दिवाळी गोड व्हावी, अशा भावनेतून पिंपरी-चिंचवडकरांनी मदतकार्यात सहभागी व्हावे, असे आवाहन करतो.
>
> **- महेश लांडगे,** आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

2019 मध्ये पश्चिम महाराष्ट्रात निर्माण झालेली पूरपरिस्थिती आणि कोकणातील चक्रीवादळ आपत्तीच्या काळात भाजपा आमदार महेश लांडगे यांनी "एक हात मदतीचा" मोहीम हाती घेतली होती. त्यावेळी मोठ्या प्रमाणात मदतकार्य करण्यात आले. त्याचे महाराष्ट्रभरात कौतूक झाले होते.

आता मराठवाडा आणि अन्य जिल्ह्यांमध्ये महापूर परिस्थिती आहे. पिंपरी-चिंचवडमधून पुन्हा एकदा मदतकार्य उभा करण्यासाठी नियोजन बैठक घेण्यात आली. यावेळी माजी महापौर नितीन काळजे, राहुल जाधव, माजी स्थायी समिती सभापती संतोष लोंढे, विलास मडिगेरी, नितीन लांडगे, दक्षिण भारत मोर्चा प्रदेशाध्यक्ष राजेश पिल्ले, भाजपा सरचिटणीस विकास डोळस, यांच्यासह सर्व माजी नगरसेवक, प्रमुख पदाधिकारी व मान्यवर उपस्थित होते.

### हिंदुभूषण स्मारक ट्रस्टचाही पुढाकार...

एक हात मदतीचा' उपक्रमांतर्गत मराठवाड्यातील 50 गावांमध्ये मदत एकाच दिवशी रवाना करण्याचे नियोजन आहे. दि.3 ते 11 ऑक्टोबर 2025 मदत संकलन, पॅकिंग आणि वितरण व्यवस्था करण्यात येणार आहे. तसेच, गुरूवार दि. 9 ऑक्टोबर रोजी सर्व मदतीच्या गाड्या रवाना होतील. दि. 10 व 11 रोजी पुरग्रस्त भागात मदत वितरण होईल. धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचे स्मारक "स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण' च्या आवारात मदत घेवून जाणाऱ्या गाड्यांचे पूजन होईल आणि मदत मराठवाड्याकडे पाठवण्यात येईल. याकामी हिंदुभूषण स्मारक ट्रस्ट नियोजन कार्यात पुढाकार घेत आहे.

---

# ८० हजार ४४१ शिधापत्रिकाधारकांचे 'केवायसी' पूर्ण

## पिंपरी चिंचवड शहरातील 'ई-केवायसी' प्रक्रियेला गती

।पिंपरी चिंचवड। प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड| प्रतिनिधी: सर्व शिधापत्रिकाधारकांची 'केवायसी' (नो युवर कस्टमर) पूर्ण करून घेण्याची सूचना राज्य शासनाने केली आहे. त्यानुसार पिंपरी चिंचवड शहरात या प्रक्रियेला गती मिळाली आहे. शहरातील सुमारे तीन लाख शिधापत्रिकाधारकांची 'ई-केवायसी' (ऑनलाइन) पूर्ण झाली आहे. पिंपरी, चिंचवड आणि भोसरी या तीनही कार्यालयांतर्गत ८० टक्के प्रक्रिया पूर्ण झाली आहे.**



केंद्रासह राज्य शासनाकडून वारंवार आवाहन करूनही शिधापत्रिकाधारक 'केवायसी'कडे पाठ फिरवताना दिसत आहे. त्यामुळे वर्ष उलटूनही अद्याप शहरातील शिधापत्रिकाधारकांची 'केवायसी' रखडलेली आहे. या पूर्वी शासनाने धान्य पुरवठा बंद करण्याचा इशाराही दिला होता. तरीही त्याकडे बहुतांश जणांनी दुर्लक्ष केले.

> सध्या 'केवायसी' प्रक्रिया पूर्ण करण्याच्या कामाला गती दिली आहे. शासनाने सर्व शिधापत्रिकाधारकांची केवायसी प्रक्रिया पूर्ण करण्याची सूचना दिली आहे. त्यानुसार ८० टक्क्यांपर्यंत प्रक्रिया पूर्ण झाली आहे. उर्वरित लवकरच पूर्ण करण्याचा प्रयत्न आहे.
>
> **-विजयकुमार क्षीरसागर,** परिमंडळ अधिकारी, चिंचवड.

त्यामुळे अधिकाऱ्यांनी स्वस्त धान्य दुकानदारांना 'केवायसी' करून घेण्याची सूचना दिली आहे. सध्या पिंपरी येथील अन्नधान्य पुरवठा व वितरण कार्यालयांतर्गत ८० हजार ४४१ शिधापत्रिकाधारकांचे 'केवायसी' पूर्ण असून ३७ हजार ८९३ जणांकडून ही प्रक्रिया बाकी आहे. चिंचवड कार्यालयांतर्गत एक लाख १७६ शिधापत्रिकाधारकांचे केवायसी पुर्ण असून ३९ हजार ४७७ शिधापत्रिकाधारकांचे केवायी अपूर्ण आहे. भोसरी कार्यालयांतर्गत एक लाख १६ हजार ५९२ शिधापत्रिकाधारकांचे 'केवायसी' पूर्ण आहे. तर, २५ हजार ४८९ जणांनी अजूनही ही प्रक्रिया केलेली नाही.

### पिंपरी कार्यालयाचा वेग सर्वाधिक

पिंपरी येथील अन्नधान्य पुरवठा व वितरण कार्यालयांतर्गत सध्या ८० हजार ४४१ शिधापत्रिकाधारकांची केवायसी पूर्ण झाली आहे. या विभागात ३७ हजार ८९३ शिधापत्रिकाधारकांची प्रक्रिया अद्याप अपूर्ण आहे. अधिकाऱ्यांनी स्वस्त धान्य दुकान संचालकांना लाभार्थ्यांकडून तातडीने केवायसी करून घेण्याच्या सूचना दिल्या आहेत.

### चिंचवडमध्ये १ लाखांहून अधिक केवायसी पूर्ण

चिंचवड कार्यालयांतर्गत १ लाख १७६ शिधापत्रिकाधारकांनी केवायसी प्रक्रिया पूर्ण केली आहे, तर ३९ हजार ४७७ लाभार्थ्यांनी अद्यापही प्रक्रिया केली नाही. परिमंडळ अधिकारी विजयकुमार क्षीरसागर यांनी सांगितले की, "शासनाच्या निर्देशानुसार शहरातील केवायसी प्रक्रियेला गती देण्यात आली आहे. ८० टक्क्यांहून अधिक शिधापत्रिकाधारकांनी ही प्रक्रिया पूर्ण केली आहे. उर्वरित लाभार्थ्यांपर्यंत तातडीने पोहोचून सर्वांचे केवायसी पूर्ण करण्याचा प्रयत्न सुरू आहे."



## भूमिका

# प्रचारात लोकांचे मुद्दे हरले

**कमला हॅरिस म्हणजे ‘गर्भपात-बंदीला विरोध, महिलांना प्रजोत्पादनाबद्दल निर्णयस्वातंत्र्य’ आणि डोनाल्ड ट्रम्प म्हणजे ‘स्थलांतरितांना अटकाव’ आणि ‘आयातीवरील कर (टॅरिफ) वाढवणे’ हेच मुद्दे अमेरिकी राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणूक- प्रचारातून सातत्याने लोकांपर्यंत पोहोचत होते.**

अधूनमधून कमला हॅरिस यांनी बड्या किराणा दुकानांच्या- सुपरमार्केट्सच्या- नफेखोरीचा विषय भाषणांमध्ये आणला; या नफेखोरीला आपण चाप लावणार असे त्या म्हणाल्या. त्यावर ट्रम्प यांनी ‘महागाई वाढली कोणाच्या काळात?’ असे प्रत्युत्तर दिले आणि मग हॅरिस यांनीही महागाईचा विषय फारसा वाढवला नाही.अमेरिका हा देश स्वत:ला कालपरवापर्यंत ‘सर्वांत महान लोकशाही’ म्हणवत होता, कदाचित यापुढेही कुणी तसे म्हणत राहील... पण अमेरिकेच्या ४७ व्या राष्ट्राध्यक्षांच्या निवडीसाठी झालेल्या निवडणुकीत ‘लोकशाही’ कितपत होती? प्रचारात लोकांच्या जिव्हाळ्याचे मुद्दे कितपत होते? आरोग्यसेवेचा मुद्दाच दोघांच्याही प्रचारात नव्हता. अमेरिकेतली आरोग्यसेवा अत्यंत महाग आहे, न परवडणारी आहे, हे खरे दुखणे. पण ट्रम्प यांनी २०१६ च्या प्रचारात तर, ‘ओबामाकेअर’ म्हणून त्या वेळी गाजावाजा झालेली राष्ट्रव्यापी आरोग्य विमा योजना बंद करून टाकू, असेही म्हटले होते. तसे काही त्यांनी पहिल्या कारकीर्दीत



केले नाही. पण या वेळी त्यांनी आरोग्यसेवेसाठी जणू, अमेरिका एकदा का पुन्हा महान झाली की सारे अमेरिकन लोक खडखडीत बरे होणार, असा सूर लावला... आपण पुन्हा निवडून आल्यास पुढल्या चार वर्षांत अमेरिकनांमध्ये कर्करोगाचे प्रमाण निम्म्याने कमी होईल, असे ट्रम्प म्हणाले! हॅरिस यांनी काही इन्शुलिन स्वस्त करण्याचे आश्वासन एका प्रचारसभेत दिले. पेनसिल्व्हानियातील रहिवाशांना आरोग्यसेवेसाठी घ्यावी लागलेल्या कर्जांतून मुक्त करण्यासाठी ४० लाख डॉलरच्या निधीची घोषणा पेनसिल्व्हानियाचे गव्हर्नर आणि हॅरिस यांच्या सोबतीने उपाध्यक्षपदाची निवडणूक लढवण्यास उत्सुक असलेले जोश शॅपिरो यांनी केली होती; याचा उल्लेख शॅपिरोंची निवड हॅरिस यांनी केली नसूनही त्या राज्यात, हॅरिस यांच्या प्रचारासाठी होत राहिला, पण मुळात पेनसिल्व्हानियातील रहिवाशांची आरोग्य-कर्जे ४० कोटी डॉलरच्या वर आहेत... ४० लाखांत ते कर्जमुक्त कसे होणार, हा प्रश्न कुणालाच पडला नाही, इतका आरोग्याचा मुद्दा वरवरचा राहिला. अमेरिकेतील संघटित कामगारांचे दोन मोठे संप जो बायडेन यांच्या कार्यकाळात झाले. पहिला युनायटेड मोटर्समध्ये आणि दुसरा गोदी कामगारांचा संप. हे दोन्ही संप – विशेषत: गोदी संप- मिटवण्यात बायडेन प्रशासनाने पुढाकार घेतला होता. पण कामगारांना कामाचे ठराविक तास आणि कामाचे योग्य दाम मिळवून देण्याचा मुद्दा बायडेन यांच्याच प्रशासनात गेली साडेतीन वर्षे उपाध्यक्ष म्हणून काम करणाऱ्या हॅरिस यांना काढावासा वाटला नाही. ट्रम्प हे या मुद्द्यापासून अर्थातच दूर होते. ते केवळ अमेरिकी ‘भूमिपुत्रां’ना रोजगार मिळवून देण्याच्या बाता करत होते, कामगारांचे हक्क वगैरे त्यांच्या गावीही नव्हते. तरीही कामगारवर्गीयांची पसंती ट्रम्प यांना असल्याचे ताजा निकाल सांगतो आहे, कारण या हक्कांच्या ऐवजी ट्रम्प यांनी अमेरिकी अस्मितेचा आणि ‘स्थलांतरित’ या काल्पनिक शत्रूचा गवगवा प्रचारात केला. याउलट, कामगारांची प्रतिष्ठा वाढवण्याचा मुद्दा हॅरिस यांना मते मिळवून देणारा ठरला असता. पण आधीच विनाकारण ‘डाव्या’ असा शिक्का बसलेल्या हॅरिस यांनी कामगार हक्कांची भाषा कधी केली नाही आणि प्रचारात ‘डावे’ दिसणाऱ्या मुद्द्यांना स्थान देणे त्यांनी टाळले, असा निष्कर्ष आता निघतो. ‘जॅकोबिन’ तसेच ‘द न्यू रिपब्लिक’ सारख्या, अमेरिकेच्या दृष्टीने डाव्या राजकारणाचा मवाळ पुरस्कार करणाऱ्या नियतकालिकांनी तर ‘कमला हॅरिस यांचा प्रचार अभिजनवर्गापुरताच राहिला’ असा निष्कर्षही काढलेला आहे.मदतीने पेनसिल्व्हानिया या राज्यातील एक हजार कामगारवर्गीय मतदारांना ‘जॅकोबिन’ने प्रश्न विचारले आणि उत्तरांची विभागणी, त्यांतून दिसलेल्या कलानुसार सात गटांमध्ये केली – ‘टोकाचा लोकानुनय’ (जो ट्रम्प करत होतेच), ‘प्रागतिक अर्थकारण’, ‘फार धाडसी निर्णय न घेणारे अर्थकारण’, ‘सौम्य लोकानुनय’ (जो हॅरिस यांनीसुद्धा केला), ‘गर्भपाताचा हक्क हवाच’, ‘स्थलांतरामुळे काही बिघडत नाही’ आणि ‘लोकशाहीला धोका आहे.

## प्रासंगिक »

### माणसांची माकडे

***तरुण जेन गुडालचे अफ्रिकेत जाणे हे कोलंबसाने अमेरिकेत जाण्याइतकेच महत्त्वाचे होते...***

मनुष्यांतील माकडपण वाढू लागलेले असताना माकडांतील माणूसपण आणि माणुसकी यांचा शोध घेणाऱ्या निसर्गस्नेही जेन गुडाल यांचे जाणे जगभरातील समानधर्मींसाठी वेदनादायी असेल. इंग्लंडने जगास फार मोठे पर्यावरणप्रेमी अभ्यासक दिले. जिम कॉर्बेट, केनेथ अँडरसन, सर डेव्हिड अॅटनबरो इत्यादी. अशा देदीप्यमानांच्या मालिकेतील जेन गुडाल या शेवटच्या. यांची तुलना करणे अयोग्य; पण तरीही अन्यांपेक्षा जेन गुडाल यांचे मोठेपण या आणि अशा सर्वांस पुरून उरते. प्रत्येक बाल्याच्या मनात जन्मत:च असलेले निसर्गप्रेम सहृदय, जागरूक पालकत्वामुळे एखाद्याच्या जगण्याचे प्रयोजनच कसे बनते आणि अशी व्यक्ती मग इतरांसाठीही कसे प्रेरणादायी आयुष्य जगून जाते याचे अत्यंत सात्त्विक, सालस उदाहरण म्हणजे जेन गुडाल. “आसपास जे काही चालले आहे ते पाहून उद्विग्नता येते. वाटते अंथरुणातून उठूच नये. पण लक्षात येते की वाचवायला हवे, असे अजूनही बरेच काही आहे.

सर्वांत वेगवान, सर्वांत लांबलचक, सर्वांत उंच, सर्वांत भव्य... सारं कसं चकाचक दिसलं पाहिजे. नद्या कितीही प्रदूषित असू देत रिव्हरफ्रन्ट मात्र लख्ख हवा, नव्या कोऱ्या उड्डाणपुलांवर खड्डे पडले तरी चालतील, पण त्यांची ग्राफिटीने वारंवार रंगरंगोटी मात्र झालीच पाहिजे.

# महाशक्तीचं स्वप्न पाहणाऱ्या देशात एवढी ‘पडझड’

एखादी जागतिक परिषद होतेय, गरिबी- अस्वच्छता पडदे लावून झाकून ठेवा, परदेशी पाहुण्यांना सारं काही आंतरराष्ट्रीय दर्जाचं दिसलं पाहिजे. भविष्याचा विचार सोडा. वर्तमानात जगा. उद्घाटनापुरतं तरी सारं काही भव्यदिव्य असलं पाहिजे. फोटो व्हिडीओमध्ये सुंदरच दिसलं पाहिजे. घर ते बाजार, शाळा, ऑफिस या रोजच्या ५-१० किलोमीटरमध्ये कितीही खड्डे, गर्दी, विलंब चालेल, प्राधान्य मात्र बुलेट ट्रेनला हवं... देशातल्या पायाभूत सुविधांबाबत असाच काहीसा दृष्टिकोन दिसू लागला आहे.पंतप्रधानांच्याच हस्ते २२ जानेवारी २०२४ रोजी अयोद्धेतल्या बहुप्रतीक्षित राममंदिरात श्री रामांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली.

भव्य सोहळा झाला. आणि अवघ्या सहा महिन्यांत जून २०२४मध्ये गाभाऱ्यालगतच्या मंडपाला गळती लागली. नूतनिकरण झालेल्या अयोध्या रेल्वे स्थानकाचा परिसर जलमय झाला. राम पथावर खड्डे पडले, पाणी साचलं. पाण्याचा तातडीने उपसा करण्यात



आला, मात्र भाविकांना चिखलातून जावं लागलं. मंदिराची संगमरवरी फरशी कळकट तर झालीच शिवाय त्यावरून पाय घसरू लागले. संबंधित यंत्रणांनी मंदिराचं बांधकाम अद्याप पूर्ण झालेलं नाही, वरचे भाग खुलेच असल्यामुळे पाणी वाहून खाली आलं, असं स्पष्टीकरण दिलं.

पण बांधकाम अर्धवट असताना प्राणप्रतिष्ठा करण्याची घाई का केली हा त्यावेळी शंकराचार्यांनी उपस्थित केलेला प्रश्न पुन्हा एकदा अधोरेखित झाला. ४ डिसेंबर २०२३... सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या राजगड किल्ल्यावर पंतप्रधानांच्या हस्ते शिवरायांच्या ३५ फुटी पुतळ्याचं अनावरण झालं आणि अवघ्या नऊ महिन्यांत २८ ऑगस्ट २०२४ रोजी पुतळा कोसळला. महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली.पंतप्रधानांनी १२ जानेवारी २०२४ रोजी मुंबई आणि नवी मुंबईला जोडणाऱ्या, तब्बल १८ कोटी रुपये खर्च करून उभारलेल्या अटल सेतूचं उद्घाटन केलं. लगोलग छायाचित्रं, चित्रफिती व्हायरल झाल्या. या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या लांबलचक पुलावरून विहंगम दृश्य पाहत प्रवास करण्यासाठी मुंबई, नवी मुंबईकरांची रिघ लागली आणि पाचच महिन्यांत २१ जून २०२४ रोजी बातमी आली- अटल सेतूला तडे गेले.

जबलपूर एअरपोर्टच्या नव्या टर्मिनलचं छत २८ जून २०२४ रोजी कोसळलं. हे छत म्हणजे विमानतळाचं सौंदर्य वाढवण्याच्या दृष्टीने उभारलेली कापडी कानॉपी होती. पावसाचं पाणी त्यावर साठलं आणि ती फाटून खालून जाणाऱ्या वाहनावर कोसळली. गाडीच्या छताचा आणि काचांचा अक्षरशः चक्काचूर झाला. या टर्मिनलचं आवघ्या तीनच महिन्यांपूर्वी १० मार्च २०२४ रोजी उद्घाटन झालं होतं- पंतप्रधानांच्याच हस्ते.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

पूरग्रस्त शेतकऱ्यांशी संवाद

११ ऑक्टोबर रोजी आयुक्तालयावर मोर्चा

# उद्धव ठाकरे करणार हंबरडा मोर्चाचे नेतृत्व!

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**संपूर्ण कर्जमुक्तीसाठी शिवसेना उद्धव ठाकरे पक्ष आता आक्रमक झाला असून सोमवारपासून (दि.५) ते ११ ऑक्टोबर दरम्यान विविध पातळ्यांवर आंदोलन ठरविण्यात आले असून ११ ऑक्टोबर रोजी विभागीय आयुक्तालयावर होणाऱ्या मार्चोचे नेतृत्व पक्षप्रमुख उद्धव ठाकरे करणार आहेत.**

## मुंबईवर श्वेतपत्रिका काढणार



धाराशिव व लातूर जिल्ह्यात ठाकरे यांनी अतिवृष्टी व पूरग्रस्त शेतकऱ्यांशी संवाद साधला होता. त्यानंतर छत्रपती संभाजीनगर येथे हंबरडा मोर्चाचे आयोजन करण्यात आल्याचे शिवसेना नेते अंबादास दानवे यांनी कळविले आहे. मराठवाड्यातील पूरस्थितीमुळे शेतकरी हैराण झाला असून कर्जमुक्तीची मागणी जोर धरत आहे. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वात या मागणीला अधिक टोकदारपणे पुढे नेण्यासाठी शिवसेना मैदानात उतरली आहे. या मोर्चाच्या तयारीसाठी ५ ते ७ ऑक्टोबर रोजी ग्रामसभा, गावभेटी व बैठकांचे आयोजन करण्यात आले आहे. ८ ऑक्टोबर रोजी प्रत्येक तहसील व जिल्हाधिकारी कार्यालयावर धरणे व निदर्शने केली जाणार आहेत.त्यानंतर हंबरडा मोर्चा आयोजित करण्यात आला आहे. या निमित्ताने जिल्ह्यात खिळखिळे झालेल्या संघटना बांधणीला शिवसेना ठाकरे गट जोर देत असल्याचे सांगण्यात येत आहे. गेल्या काही महिन्यात छत्रपती संभाजीनगरचे नेतृत्व करणारे सात माजी महापौर शिंदे गटात गेले होते. ग्रामीण भागातील अनेक कार्यकर्तेही एकनाथ शिंदे यांचे नेतृत्व स्वीकारत आहेत. मात्र, अतिवृष्टी आणि पूर यामुळे निर्माण झालेला रोष कर्जमुक्तीच्या मागणी पुढे रेटण्यास उपयोगी पडू शकत असल्याने मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचे नेतृत्व स्वत: उद्धव ठाकरे करणार आहेत.महाराष्ट्रात गोमाता आणि बाजूला जाऊन खाता, असे तुमचे हिंदुत्व आहे. तुम्हाला नशिबाने संधी मिळाली आहे. त्या संधीचे सोने करा, पण चिखल करू नका, असे ठणकावतानाच भाजप लोकशाहीला अंधाऱ्या खाईत घेऊन चालला आहे.

त्या अंधाऱ्या खाईत जायचे नसेल तर शिवसेनेची मशाल घेऊनच पुढे जावे लागेल, असे आवाहन करीत उद्धव यांनी स्थानिक निवडणुकांच्या प्रचाराचे रणशिंग फुंकले. शिवाजी पार्कवर झालेल्या दसरा मेळाव्यात उद्धव यांनी सर्वाधिक तोफ डागली ती भाजपवर. त्याखालोखाल शिवसेनेच्या शिंदे गटाला त्यांनी लक्ष्य केले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत ठाकरे सेनेची मुख्य लढाई भाजपविरुद्ध असेल, असा संदेशच उद्धव यांनी आपल्या शिवसैनिकांना दिला. मुंबईत परतीच्या पावसाच्या सरी कोसळत असताना शिवसेना उद्धव ठाकरे गटाचा पारंपरिक दसरा मेळावा गुरुवारी शिवाजी पार्कवर झाला. भर पावसात उपस्थित असलेल्या शिवसैनिकांशी संवाद साधत उद्धव ठाकरे यांनी हिंदुत्वाच्या मुद्द्यावरून भाजप, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, पंतप्रधान मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीकास्त्र सोडले. मराठवाड्यातील अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत द्या आणि संपूर्ण कर्जमुक्तीच्या मागणीचा पुनरुच्चार करतानाच ही मागणी मान्य न झाल्यास रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याचा इशाराही उद्धव यांनी दिला. खरेतर मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्री यांनी दिल्लीत ठाण मांडून बसायला पाहिजे होते. केंद्राकडून दहा-वीस हजार कोटींची मदत मागायला पाहिजे होती. पण पंतप्रधानांना प्रस्ताव हवा आहे आणि फडणवीसांचा अभ्यास सुरू आहे.

## भाजपचे दिवा स्वप्न

निर्माण झालेला रोष कर्जमुक्तीच्या मागणी पुढे रेटण्यास उपयोगी पडू शकत असल्याने मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचे नेतृत्त्व स्वत: उद्धव ठाकरे करणार आहेत.महाराष्ट्रात गोमाता आणि बाजूला जाऊन खाता, असे तुमचे हिंदुत्व आहे. तुम्हाला नशिबाने संधी मिळाली आहे. त्या संधीचे सोने करा, पण चिखल करू नका, असे ठणकावतानाच भाजप लोकशाहीला अंधाऱ्या खाईत घेऊन चालला आहे.

बिहार निवडणुकांच्या तोंडावर पंतप्रधानांनी महिलांच्या खात्यात प्रत्येकी दहा हजार टाकले. सर्व मिळून दहा हजार कोटी दिले. बिहारमधून प्रस्ताव आला नव्हता. केंद्राला उद्ध्वस्त झालेल्या महाराष्ट्राला द्यायला पैसे नाहीत. बिहारच्या मागच्या निवडणुकीत सव्वा लाख कोटी मोदींनी जाहीर केले. धाराशिव व लातूर जिल्ह्यात ठाकरे यांनी अतिवृष्टी व पूरग्रस्त शेतकऱ्यांशी संवाद साधला होता. त्यानंतर छत्रपती संभाजीनगर येथे हंबरडा मोर्चाचे आयोजन करण्यात आल्याचे शिवसेना नेते अंबादास दानवे यांनी कळविले आहे. मराठवाड्यातील पूरस्थितीमुळे शेतकरी हैराण झाला असून कर्जमुक्तीची मागणी जोर धरत आहे. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वात या मागणीला अधिक टोकदारपणे पुढे नेण्यासाठी शिवसेना मैदानात उतरली आहे.

या मोर्चाच्या तयारीसाठी ५ ते ७ ऑक्टोबर रोजी ग्रामसभा, गावभेटी व बैठकांचे आयोजन करण्यात आले आहे. ८ ऑक्टोबर रोजी प्रत्येक तहसील व जिल्हाधिकारी कार्यालयावर धरणे व निदर्शने केली जाणार आहेत.त्यानंतर हंबरडा मोर्चा आयोजित करण्यात आला आहे. या निमित्ताने जिल्ह्यात खिळखिळे झालेल्या संघटना बांधणीला शिवसेना ठाकरे गट जोर देत असल्याचे सांगण्यात येत आहे. गेल्या काही महिन्यात छत्रपती संभाजीनगरचे नेतृत्व करणारे सात माजी महापौर शिंदे गटात गेले होते. ग्रामीण भागातील अनेक कार्यकर्तेही एकनाथ शिंदे यांचे नेतृत्व स्वीकारत आहेत.

# तणाव निर्माण करणाऱ्यांवर कारवाई करा

## अजित पवार; मुस्लिम समाजाच्या शिष्टमंडळाची भेट

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**शहरातील मुस्लिम समाजाच्या शिष्टमंडळाने पारनेर येथे उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेऊन शहरासह जिल्ह्यात जाणीवपूर्वक जातीय तणाव निर्माण करणाऱ्या घटना वारंवार घडत असल्याकडे लक्ष वेधले.**



उपमुख्यमंत्री पवार यांनी या प्रश्नावर जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांना बोलावून जातीय तणाव निर्माण करणाऱ्या व्यक्तीविरोधात त्याचा पक्ष न पाहता कठोर कारवाई करावी, असा आदेश दिला. तसेच जातीय तणाव कमी करण्यासाठी मोहल्ला समिती स्थापण्याची सूचना केली.कोठला येथील रास्ता रोको आंदोलनाशी संबंध नसताना अनेकांना अटक करण्यात आली, त्यांची नावे वगळावीत. पोलीस गुन्ह्याशी संबंध नसलेल्या व्यक्तींना त्रास देत आहेत, ते त्वरित थांबवावे. पोलीस प्रशासनाने पहाटेची गस्त वाढवावी. प्रक्षोभक भाषण करणाऱ्यांविरोधात 'हेट स्पीच'प्रकरणी पोलिसांनी स्वतःहून कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.या प्रसंगी उबेद शेख, शौकत तांबोळी, माजी उपमहापौर नजीर शेख,मतीन सय्यद, राजू सुपेवाले, ॲड. सय्यद अख्तर, मोबीनमुल्ला तांबटकर, फारुख बागवान, डॉ. रिजवान शेख, ॲड. हाफिज जहागीरदार, माजी पोलीस अधिकारी रऊफ रोख, ॲड. मोबीन, फय्याज जहागीरदार, फैरोज सय्यद आदींच्या शिष्टमंडळाने मागणी केली.

## आय लव्ह मोहम्मद रांगोळी विटंबना

शिष्टमंडळाने सांगितले, की मागील १० महिन्यांपासून काही लोकप्रतिनिधी व जातीयवादी संघटनेचे लोक वारंवार तणाव निर्माण होईल असे वक्तव्य करत आहेत. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्यासाठी जाणूनबुजून कृत्य सुरू आहे. पोलीस प्रशासन त्यांच्या विरोधात कारवाई करत नाही.

**डोनाल्ड ट्रम्प यांचा इशारा**

## शांतता प्रस्ताव न स्वीकारल्यास युद्ध

# ट्रम्प यांनी हमासला दिली रविवारपर्यंत मुदत!

### शांतता प्रस्ताव इस्रायलने मान्य केला

### इतर देशांनीही त्याचे स्वागत केले

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**गाझामध्ये शांतता प्रस्थापित करण्यासाठी आपण मांडलेला २० कलमी प्रस्ताव हमासने रविवार संध्याकाळपर्यंत स्वीकारला पाहिजे, अन्यथा गाझामध्ये आणखी तीव्र लष्करी कारवाई करण्यात येईल, असा इशारा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी शुक्रवारी दिला. पुढील आठवड्यात, ७ ऑक्टोबरला या युद्धाला दोन वर्षे पूर्ण होत आहेत. त्यापूर्वी युद्ध थांबवून ओलिसांना परत आणण्यासाठी ट्रम्प आग्रही आहेत.**



ट्रम्प यांनी सोमवारी मांडलेला शांतता प्रस्ताव इस्रायलने मान्य केला आहे. भारतासह पॅलेस्टी नेते, अरबी राष्ट्र आणि इतर देशांनीही त्याचे स्वागत केले आहे. मात्र, हमासने अद्याप हा प्रस्ताव स्वीकारत असल्याचे किंवा नाकारत असल्याचे अधिकृतरित्या सांगितलेले नाही. मात्र, या प्रस्तावातील काही मुद्द्यांवर अधिक वाटाघाटी करण्याची गरज आहे, अशी भूमिका हमासचा एक नेता आणि युद्धसमाप्तीसाठी सुरुवातीपासून प्रयत्न करणाऱ्या इजिप्त आणि कतार या देशांनी मांडली आहे. दुसरीकडे, इस्रायलने गाझा पट्टीवरील हल्ले सुरूच ठेवले असून शुक्रवारी त्यांनी केलेल्या हवाई आणि जमिनीवरून हल्ल्यामध्ये शुक्रवारी किमान ५७ पॅलेस्टिनी मारले गेले. तर गुरुवारी इस्रायलच्या हल्ल्यात दक्षिण गाझात किमान २९ जणांचा मृत्यू झाला. दुसरीकडे, गाझाकडे मदतपुरवठा घेऊन निघालेले कार्यकर्त्यांचे अखेरचे जहाजही इस्रायली सैन्याने शुक्रवारी अडवले. वॉशिंग्टन डीसीच्या वेळेनुसार रविवारी संध्याकाळी ६ वाजेपर्यंत हमासने प्रस्तावाला मान्यता दिली पाहिजे. प्रत्येक देशाने सही केली आहे!

शेवटची संधी असलेला हा करार मान्य केला नाही तर, हमासविरोधात यापूर्वी कधी झाली नव्हती अशी कारवाई केली जाईल. मध्यपूर्वेत या ना त्या मार्गाने शांतता प्रस्थापित होईलच! अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी शुक्रवारी हमास या दहशतवादी संघटनेला कठोर शब्दात निर्वाणीचा इशारा दिला आहे. हमासने इस्रायलबरोबर रविवारी संध्याकाळी ६ वाजेपर्यंत शांतता करार केलाच पाहिजे अन्यथा सर्व उद्ध्वस्त होईल असे ट्रम्प असे ट्रम्प म्हणाले आहेत. तसेच हमासला त्यांचा शांतता करार स्वीकार करण्याची, इस्रायली ओलिसांना सोडण्याची आणि संघर्ष संपवण्याची ही शेवटची संधी दिली जात आहे, असेही त्यांनी नमूद केले आहे. विशेष म्हणजे, इस्त्रायलचे पंतप्रधान बिन्यामिन नेतान्याहू यांनी आधीच युद्धविरामाच्या कराराला सहमती दर्शवली आहे. आता या इशाऱ्यानंतर हमास काय निर्णय घेणार हे महत्त्वाचे ठरणार आहे. दरम्यान गेल्या दोन वर्षांपासून

दिल्लीतील बुधवारी झालेल्या कार्यक्रमामध्ये, संघाच्या शताब्दीनिमित्त केंद्र सरकारच्या वतीने विशेष टपाल तिकीट आणि १०० रुपयांचे स्मृतिचिन्ह नाणे प्रकाशित करण्यात आले. नाण्याच्या एका बाजूस राष्ट्रीय चिन्ह असून दुसऱ्या बाजूस वरद मुद्रा धारण केलेली भारतमाता, सिंह आणि तिला वंदन करणारे स्वयंसेवक दर्शविले आहेत. या वैशिष्ट्यांचा मोदींनी विशेष उल्लेख केलासंघाचे सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे उपस्थित होते

गाझा येथे सुरू असलेले युद्ध थांबवण्याकरिता डोनाल्ड ट्रम्प हे इस्रायल आणि हमास यांच्यातील शांतता करारासाठी दोन्ही बाजूंवर दबाव टाकत आहेत. ट्रम्प यांनी युद्ध थांबवण्यासाठी २० मुद्द्यांचे प्रस्ताव मांडला आहे. या प्रस्तावात फक्त तात्काळ युद्ध थांबवण्याची मागणीच नाही तर, युद्धानंतर गाझातील प्रशासन कसे असेल, यासाठीची फ्रेमवर्क देखील त्यांनी मांडली आहे. "मध्यपूर्वेत आपण कोणत्याही परिस्थितीत शांतता प्रस्थापित करू. हिंसा आणि रक्तपात थांबेल. आता मृत झालेल्यांच्या मृतदेहांसह सर्व ओलिसांना सोडा! वॉशिंग्टन, डीसी वेळेनुसार रविवारी संध्याकाळी ६ पर्यंत हमासबरोबर करार झालाच पाहिजे. त्यावर प्रत्येक देशाने सही केली आहे! जर ही अखेरची संधी असलेला करार झाला नाही तर हमासविरूद्ध यापूर्वी कोणीही पाहीला नसेल असा विध्वंस होईल," अशी पोस्ट ट्रम्प यांनी ट्रूथ सोशलवर केली आहे. ट्रम्प यांनी ७ ऑक्टोबर २०२३ रोजी इस्रायलवर झालेल्या हल्ल्याला नरसंहार म्हटले आहे, तसेच त्यांनी मध्यपूर्वेत हमास अनेक वर्षांपासून 'निर्दयी' आणि 'हिंसक धोका' राहिल्याचे म्हटले आहे. मागील दोन वर्षांत हजारो लोकांच्या मृत्यूस कारणीभूत ठरलेला इस्रायल-हमास संघर्ष संपुष्टात यावा, यासाठी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी २० मुद्द्यांचा समावेश असलेला शांततेचा प्रस्ताव जाहीर केला आहे. ट्रम्प यांच्या प्रस्तावाला इस्रायलने मान्यता दिली आहे, तर यावर अभ्यास करून प्रतिसाद देऊ, अशी प्रतिक्रिया हमासने दिली होती.

# राजीव प्रताप यांची हत्या की रस्ता अपघात?

## उत्तराखंडमधील पत्रकार मृत्यू प्रकरणात SITचा मोठा खुलासा

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**उत्तराखंडमधील पत्रकार राजीव प्रताप यांच्या मृत्यूची गेल्या काही दिवसांपासून चांगलीच चर्चा होताना दिसत आहे. यादरम्यान प्रताप यांच्या मृत्यूची चौकशी करणाऱ्या विशेष तपास पथकाने (SIT) केलेल्या तपासात धक्कादायक माहिती समोर आली आहे. एसआयटीने म्हटले आहे की, १८ सप्टेंबर रोजी त्यांच्या कारचा अपघात होण्यापूर्वी ते दारूच्या नशेत होते आणि आपघातानंतर ते नदीत कोसळले.**



इंडियन इंस्टिट्यूट ऑफ मास कम्युनिकेशनचे (IIMC) माजी विद्यार्थी असलेले राजीव प्रताप ( ३६) दिल्ली उत्तराखंड लाईव्ह (DELHI UTTARAKHAND LIVE) नावाचे एक यूट्यूब चॅनल चालवत होते. १९ सप्टेंबर रोजी प्रताप हे उत्तरकाशी येथून बेपत्ता झाल्याची नोंदवण्यात आले होते. त्यानंतर त्यांचा मृतदेह २८ सप्टेंबर रोजी जोशियारा बंधाऱ्यात आढळून आला होता. मात्र प्रताप यांच्या कुटुंबीयांनी घातपाताचा संशय आरोप केला होता. यावेळी त्यांनी उत्तरकाशी जिल्हा रुग्णालयाचे रिपोर्टिंग आणि त्यासंबंधी प्रश्न


### १८ सप्टेंबरच्या रात्री काय झालं?

संध्याकाळी ७ वाजण्याच्या सुमारास प्रताप, सिंह आणि प्रताप यांचा कॅमेरामन मानवीर कालुदा हे पोलीस लाइन्सच्या मागे शहीद स्मारक जवळ भेटले. त्यानंतर ते टॅक्सी स्टँडकडे परत आले, जेथे त्यांनी मद्यपान सुरू केले. रात्री १० वाजण्याच्या सुमारास कालुदा घरी गेला तर प्रताप आणि सिंह हे गाडी चालवत मार्केटकडे गेले आणि त्यानंतर बस स्टँड जवळच्या एका हॉटेलात गेले.

उपस्थित केल्यावरून त्यांना धमक्या दिल्या जात होत्या असेही नमूद केले आहे. मात्र पोलिसांनी त्यांचा मृत्यू हा कार अपघातामुळे झाल्याचे म्हटले आहे. गुरुवारी एसआयटीने दावा केला की प्रताप हे मद्यपान करत होते आणि ज्या दिवशी ते बेपत्ता झाले त्या दिवशी त्यांची गाडी दरीत कोसळली. उपअधीक्षक जनक पनवार यांच्या देखरेखीखाली काम करणाऱ्या एसआयटीने दिलेल्या माहितीनुसार, प्रताप हे उत्तरकाशी पोलीस लाइनमधील हेड कॉन्स्टेबल सोबन सिंह यांच्याबरोबर दारू पीत होते.

# जॉन अभिनेता नसता तर मेकॅनिक असता

अभिषेक बच्चन आणि जॉन अब्राहमची मैत्री कोणापासूनही लपलेली नाही. अभिषेकने जॉनबद्दल बोलताना, तो अभिनेता नसून मेकॅनिक व्हायला हवा होता, असे म्हटले आहे. त्याला बाइक्सची खूप आवड आहे. बाईक चालवण्याबरोबरच तो त्यांना असेंबलही करतो. त्याला बाईकशी छेडछाड करायला आवडते. नशिबाने त्याला अभिनेता बनवले, नाहीतर तो कुठेतरी मेकॅनिक झाला असता, असे त्याने म्हटले. अभिषेकने एका जुन्या मुलाखतीत सांगितले होते की, जॉन अब्राहमनेच त्याला बाइक चालवायला शिकवले होते. आधी अभिषेक बाईक चालवताना घाबरला होता. अभिषेक आणि जॉनने धूम चित्रपटात एकत्र काम केले होते. चित्रपटाचा केंद्रबिंदू सुपर बाईकच होत्या.



अभिषेक बच्चन त्याच्या आगामी 'घूमर' चित्रपटामुळे चर्चेत आहे. चित्रपटाच्या प्रमोशनदरम्यान त्याला बाइकबाबतही काही प्रश्न विचारण्यात आले. तो म्हणाला- माझा एक मित्र आहे, जॉन अब्राहम. मला वाटते की त्याला बाईक खूप आवडतात. तो आधी बाईक डिस्मेंटल करतो आणि नंतर पुन्हा असेंबल करतो. त्याला हे काम खूप आवडते. मी त्याच्याकडून बाइक्सबद्दल खूप काही शिकलो आहे.


# माझ्या नवऱ्याला हिंदी येत नाही





'तेजाब', 'खलनायक', 'दिल तो पागल हैं', 'हम आपके है कौन', 'राम लखन', 'देवदास' अशा एकापेक्षा एक गाजलेल्या चित्रपटांमध्ये काम करून मराठमोळी माधुरी दीक्षित बॉलीवूडची 'धकधक गर्ल' झाली. तिचा चाहतावर्ग मोठ्या प्रमाणात आहे.सिनेविश्वात ४० वर्षे पूर्ण होणार असल्याने अभिनेत्री सध्या USA दौऱ्यावर आहे. माधुरी याठिकाणी तिच्या असंख्य चाहत्यांशी संवाद साधणार आहे. USA दौरा सुरू करण्यापूर्वी न्यू जर्सी येथे अभिनेत्रीने नुकतीच पत्रकार परिषद घेतली. यावेळी माधुरीला पत्रकारांनी "तुम्ही डॉ. श्रीराम नेने यांच्याशी संवाद साधताना कधी बॉलीवूड चित्रपटातील गाणी गायली आहेत का किंवा चित्रपटातले संवाद वापरले आहेत का?" असा प्रश्न विचारला. यावर अभिनेत्रीने दिलखुलासपणे उत्तर दिलं आहे.

# सुशांत निष्ठावंत नव्हता



अभिनेता सैफ अली खान याची लेक आणि अभिनेत्री सारा अली खान हिने अभिनेता सुशांत सिंह राजपूत याच्यासोबत बॉलिवूड करियरला सुरुवात केली. पहिल्याच सिनेमातून सारा, सुशांत याच्यासोबत दिसली. सिनेमा प्रदर्शित झाल्यानंतर दोघांना अनेक ठिकाणी एकत्र स्पॉट देखील करण्यात आलं. शिवाय दोघांच्या रिलेशनशिपच्या चर्चांनी देखील जोर धरला. पण अभिनेत्याच्या अचनाक निधनानंतर चाहत्यांना देखील मोठा धक्का बसला.सुशांत सिंह राजपूत हत्या प्रकरणात एनसीबीने सारा अली खान हिला चौकशीसाठी बोलावलं होतं. तेव्हा अभिनेत्रीने मोठा खुलासा केला होता. रिपोर्टनुसार, सारा हिने सुशांत डेट करत असल्याचं सांगितलं होतं. पण अभिनेत्रीने त्यांच्या ब्रेकअपचं कारण देखील सांगितलं...सारा हिने दिलेल्या माहितीनुसार, नात्यामध्ये सुशांत कधीच निष्ठावंत नव्हता. सारा म्हणाली होती, 'सुशांत प्रचंड पजेसिव होता. माझ्या आगामी सिनेमा सुशांतला कास्ट करा... असं दिग्दर्शकांना जाऊन सांग. असं तो सतत म्हणायचा...' याचदरम्यान, सारा हिने ड्रग्स सेवनाबद्दल देखील मोठं वक्तव्य केलं होतं. ' मी सिगारेट ओढली होती...' अशी कबुली साराने चौकशीमध्ये दिली होती. लोनावळा याठिकाणी सुशांत सिंह राजपूत याचा एक फार्महाऊस आहे. अभिनेत्याच्या निधनानंतर फार्महाऊसच्या केअरटेकरने IANS ला महत्त्वाची माहिती दिली होती. केअरटेकरने दिलेल्या माहितीनुसार, अभिनेता 2019 मध्ये सारा हिला प्रपोज देखील करणार होता.

# मला हेच करायचे आहे'

नुकत्याच पार पडलेल्या फिल्मफेअर पुरस्कार सोहळ्यात अभिनेत्री नुसरत भरुचाने परिधान केलेला गाऊन सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरला. काहींनी तिच्या या बोल्ड लूकची स्तुती केली तर अनेकांनी कपड्यांच्या स्टाइलवरून टीका केली. ट्रोलिंगला न जुमानता मला जसं वागायचं आहे तसंच मी वागेन असं बेधडक उत्तर नुसरत टीकाकारांना दिलं आहे. 'टाइम्स ऑफ इंडिया'ला दिलेल्या मुलाखतीत नुसरतने ट्रोलिंगवर प्रतिक्रिया दिली आहे. "सध्याची सोशल मीडियावरची परिस्थिती अत्यंत गुंतागुंतीची आहे. त्यावरील गोष्टींवर आपलं काहीच नियंत्रण नाही. अनेकजण आपली आवड, नावड त्यावर स्पष्टपणे व्यक्त करतात. ज्यांना एखादी गोष्ट नाही आवडली, त्यांना ते स्पष्टपणे बोलण्याचा अधिकार नक्कीच आहे आणि मी प्रत्येकाचा मताचा आदर करते. पण मी ज्याप्रकारचे कपडे परिधान करते, ते एकप्रकारे माझं मतंच आहे की मला हेच करायचंय आणि मी अशीच आहे. माझ्या मताचाही लोकांनी आदर करावा", अशा सडेतोड शब्दांत तिने ट्रोलर्सना सुनावलं. त्याचसोबत ट्रोलिंगचे कमेंट्स वाचत नसल्याचंही तिने सांगितलं. मला जे करायचं आहे ते मी करते, पण ते तुम्हाला आवडलंच पाहिजे असं नाही. तुमची आवड किंवा नावड हा पूर्णपणे तुमचा वैयक्तिक मत आहे, असं ती पुढे म्हणाली.नुसरतने फिल्मफेअर पुरस्कार सोहळ्यात 'हाय स्लीट गाऊन' परिधान केला होता. या गाऊनचा कट फार वरपर्यंत असल्याने त्यावरून नेटकऱ्यांनी नुसरतला ट्रोल केलं. 'आज कालचे फॅशन डिझायनर कुठे कात्री लावतील सांगता येत नाही,' असं एकाने लिहिलं तर दुसऱ्या एक फॉलोअरने, 'अरे आपल्या देशात किती गरिबी आली आहे,' अशी कमेंट केली होती.



नुकत्याच पार पडलेल्या फिल्मफेअर पुरस्कार सोहळ्यात अभिनेत्री नुसरत भरुचाने परिधान केलेला गाऊन सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरला. काहींनी तिच्या या बोल्ड लूकची स्तुती केली तर अनेकांनी कपड्यांच्या स्टाइलवरून टीका केली. ट्रोलिंगला न जुमानता मला जसं वागायचं आहे तसंच मी वागेन असं बेधडक उत्तर नुसरत टीकाकारांना दिलं आहे.

# 'कांतारा चॅप्टर 1' चित्रपटाला पायरसीचं ग्रहण लागलं



आपल्या अभिनयाने आणि दिग्दर्शनाने प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या ऋषभ शेट्टीचा बहुप्रतिक्षित चित्रपट 'कांतारा: अ लिजेंड – चॅप्टर १' नुकताच प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. तीन वर्षांपूर्वी आलेल्या 'कांतारा'ने बॉक्स ऑफिसवर प्रचंड यश मिळवल्यानंतर दुसऱ्या भागाची चाहत्यांना उत्सुकता लागून राहिली होती. पहिल्याच दिवशी या चित्रपटाला प्रेक्षकांकडून भरभरून प्रतिसाद मिळत आहे. 'कांतारा चॅप्टर १'ला प्रेक्षक आणि समीक्षकांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. त्याचबरोबर, चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर पहिल्याच दिवशी चांगली कमाई केली आहे. प्रेक्षक आणि समीक्षकांच्या पसंतीस उतरलेल्या या चित्रपटाला मात्र प्रदर्शनाच्या दुसऱ्याच दिवशी पायरसीचं ग्रहण लागलं आहे.इतर अनेक चित्रपटांप्रमाणेच 'कांतारा चॅप्टर १'देखील पायरसीचा बळी ठरत आहे. अनेक प्रेक्षक चित्रपटगृहात बसून व्हिडिओ क्लिप्स सोशल मीडियावर शेअर करत आहेत, जे कायद्याच्या दृष्टीने चुकीचे आहे. याचबद्दल अभिनेता-दिग्दर्शक ऋषभ शेट्टीने भावनिक आवाहन केलं आहे.सोशल मीडिया पोस्टमध्ये असं म्हटलंय, "कांतारा ही गोष्ट सुरुवातीपासूनच तुमची आहे. तुमच्या प्रेमामुळे आणि पाठिंब्यामुळेच ही वाटचाल शक्य झाली. आम्ही नम्रपणे विनंती करतो की, कृपया पायरसीला साथ देऊ नका. यामुळे केवळ चित्रपटाचे नुकसान होत नाही, तर हजारो लोकांचे स्वप्न, मेहनत आणि परिश्रम वाया जातात. तसंच थिएटरमध्ये बसून व्हिडीओ शूट करून सोशल मीडियावर शेअर करू नका, अगदी चांगल्या हेतूनं जरी करत असलात तरीही... 'कांतारा – चॅप्टर १' सिनेमा, त्यातील प्रत्येक दृश्य, प्रत्येक भावना तुम्ही थिएटरमध्ये मोठ्या पडद्यावर पाहण्यासाठीच बनवलेला आहे."त्यामुळे 'कांतारा चॅप्टर १'बाबत कोणीही पायरसी करू नये असं आवाहन निर्मात्यांनी केलं आहे. चित्रपटाच्या कमाईबद्दल सांगायचं झाल्यास, पहिल्याच दिवशी सर्व भाषांमध्ये मिळून तब्बल ६० कोटींचा गल्ला जमवला आहे. यामध्ये हिंदी व्हर्जनने सर्वाधिक १९.५० कोटी कमावले. पण पायरसीमुळे आता या कमाईवर परिणाम होत असल्याचं पाहायला मिळत आहे. त्यामुळे पायरसी न करण्याचं आवाहन सिनेमाचे निर्माते आणि दिग्दर्शक करत आहेत.

इराणी चषक २०२५

## शेष भारताविरुद्ध २२४ धावांची आघाडी

# विदर्भाची सामन्यावर घट्ट पकड!

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**गोलंदाजांच्या भरीव कामगिरीच्या जोरावर रणजी विजेत्या विदर्भ संघाने शेष भारताविरुद्धच्या इराणी चषक क्रिकेट लढतीवरील आपली पकड अधिक घट्ट केली आहे. तिसऱ्या दिवसअखेर विदर्भाची दुसऱ्या डावात २ बाद ९६ अशी धावसंख्या होती. त्यांच्याकडे एकूण २२४ धावांची आघाडी होती.**

### पाटीदारने एक बाजू लावून धरली



जामठा येथे सुरू असलेल्या या लढतीत विदर्भाच्या पहिल्या डावातील ३४२ धावांच्या प्रत्युत्तरात शेष भारताचा संघ २१४ धावांत गारद झाला. शुक्रवारी, लढतीच्या तिसऱ्या दिवशी ५ बाद १४२ धावांवरून पुढे खेळताना शेष भारताला आणखी केवळ ७२ धावांची भर घालता आली. कर्णधार रजत पाटीदारने (१२५ चेंडूंत ६६) एक बाजू लावून धरली, पण त्याला तळाच्या फलंदाजांची साथ मिळाली नाही.अखेरच्या चारपैकी एकही फलंदाज वैयक्तिक १५ धावांचा टप्पा ओलांडू शकला नाही. विदर्भाने पाच गोलंदाजांचा वापर केला आणि प्रत्येकाने किमान एक बळी मिळवला. त्यातही यश ठाकूर (४/६६) सर्वात यशस्वी गोलंदाज ठरला. त्याने वेगवान मारा करताना शेष भारताच्या तळाच्या चारपैकी तीन फलंदाजांना माघारी धाडले. त्यामुळे शेष भारताची धावसंख्या मर्यादित राहिली.त्यानंतर दुसऱ्या डावात फलंदाजी करण्यास आलेल्या विदर्भासाठी अमन मोखाडे (७६ चेंडूंत ३७) आणि अथर्व तायडे (४३ चेंडूंत १५) यांनी सावध सुरुवात केली. या दोघांनी १४.३ षटकांत ४२ धावांची भागीदारी रचली. पहिल्या डावातील शतकवीर तायडे दुसऱ्या डावात चमक दाखवू शकला नाही. त्याला डावखुरा फिरकीपटू मानव सुथारने माघारी धाडले. मग वेगवान गोलंदाज गुरनूर ब्रारने मोखाडेचा अडसर दूर केला. दिवसअखेर अनुभवी ध्रुव शोरी (६४ चेंडूंत नाबाद २४) आणि लयीत असलेला दानिश मालेवार (३७ चेंडूंत नाबाद १६) खेळपट्टीवर होता. भारत आणि वेस्टइंडिज या दोन्ही संघांमध्ये २ कसोटी सामन्यांच्या मालिकेतील पहिला कसोटी सामना अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर सुरू आहे. या सामन्यातील पहिल्या डावात भारतीय गोलंदाजांनी वेस्टइंडिजचा पहिला डाव अवघ्या १६२ धावांवर संपुष्टात आणला. त्यानंतर भारतीय फलंदाजांनी वेस्टइंडिजच्या गोलंदाजांचा चांगलाच समाचार घेतला. केएल राहुलने शतक झळकावल्यानंतर यष्टीरक्षक फलंदाज ध्रुव जुरेलने देखील आपलं शतक पूर्ण केलं आहे. या सामन्यातील पहिल्या डावात फलंदाजी करताना भारतीय संघाने २५० हून अधिक धावांची आघाडी घेतली आहे. ही आघाडी मिळवून देण्यात भारताच्या टॉप ५ फलंदाजांनी मोलाची भूमिका बजावली आहे. भारताकडून सलामीला आलेल्या केएल राहुलने १०० धावांची खेळी केली. तर कर्णधार शुबमन गिल अर्धशतक झळकावून माघारी परतला.ध्रुव जुरेलला साथ देताना जडेजाने देखील अर्धशतक झळकावलं. दरम्यान अर्धशतक झळकावल्यानंतर ध्रुव जुरेलने हटके सेलिब्रेशन देखील केलं आहे, ज्याचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.यष्टीच्या मागे ध्रुव जुरेलने स्वत:ला अनेकदा सिद्ध केलं आहे. पण फलंदाजीत त्याला स्वत:ला सिद्ध करण्याची संधी मिळाली नव्हती. इंग्लंड दौऱ्यावर ऋषभ पंत दुखापतग्रस्त असताना ध्रुव जुरेलला यष्टीरक्षण करण्याची संधी मिळाली होती. पण त्याला फलंदाजीची संधी मिळाली नव्हती. आता वेस्टइंडिजविरूद्धच्या कसोटी मालिकेत ध्रुव जुरेलचा यष्टीरक्षक फलंदाज म्हणून प्लेइंग ११ मध्ये समावेश करण्यात आला. या संधीचा फायदा घेत त्याने १९० चेंडूंचा सामना करत आपलं शतक पूर्ण केलं. हे त्याचं कसोटी कारकिर्दीतील पहिलं शतक ठरलं आहे.शतक झळकावल्यानंतर त्याने हटके सेलिब्रेशन केलं. त्याने बॅट उभी धरून डावीकडे सरकवलीसेवानिवृत्त जवान आहेत. वडिलांच्या लष्करी सेवेबद्दलचा आपला आदर आणि अभिमान व्यक्त करण्यासाठी त्याने हा खास जल्लोष केला .

### यश ठाकूर यशस्वी गोलंदाज

जामठा येथे सुरू असलेल्या या लढतीत विदर्भाच्या पहिल्या डावातील ३४२ धावांच्या प्रत्युत्तरात शेष भारताचा संघ २१४ धावांत गारद झाला. शुक्रवारी, लढतीच्या तिसऱ्या दिवशी ५ बाद १४२ धावांवरून पुढे खेळताना शेष भारताला आणखी केवळ ७२ धावांची भर घालता आली. कर्णधार रजत पाटीदारने (१२५ चेंडूंत ६६) एक बाजू लावून धरली.

## निवृत्तीचा नव्हे, मानसिक कणखरतेचा विचार!

# कामगिरी उंचावण्यास तिरंदाज दीपिका कुमारी उत्सुक

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारताची अनुभवी तिरंदाज दीपिका कुमारी हिने सातत्याने येणाऱ्या अपयशानंतरही आपण निवृत्तीचा नव्हे, तर मानसिकता कणखर करण्याचा विचार करत आहोत, असे सांगितले. लॉस एंजलिस २०२८ ऑलिम्पिक स्पर्धेच्या वेळी दीपिका ३४ वर्षांची असेल. मात्र, ही आपली अखेरची स्पर्धा ठरणार हे नक्की नाही, असे दीपिकाने स्पष्ट केले. तसेच आपली कारकीर्द अखेरच्या टप्प्यात आहे, असे अजिबातच नसल्याचेही तिने ठणकावून सांगितले.**




सध्या माझे प्रशिक्षण हे तांत्रिक सुधारणा आणि कणखर मानसिकतेभोवती फिरत आहे. या दोन्ही आघाड्यांवर सध्या मी काम करत आहे. तिरंदाजी लीग मला यात सुधारणा करण्यास मदतशीर ठरेल," असेही दीपिकाने सांगितले.घरच्या प्रेक्षकांसमोर खेळताना नेहमीच दडपण असते. मात्र, प्रत्यक्षात हे दडपण खेळाडूंना सर्वोत्तम कामगिरीसाठी प्रेरित करते. आपले तंत्र इतके खोलवर रुजलेले हवे की दबावाच्या क्षणी त्याबद्दल विचारही करावा लागू नये. त्यामुळे मी सरावावर खूप लक्ष देत आहे," असे दीपिका म्हणाली.नवी दिल्ली येथे सुरू झालेल्या तिरंदाजी लीगच्या उद्घाटनाला दीपिकाने आपल्या कारकीर्दीवर प्रकाशझोत टाकला. त्याच वेळी तिने लीगचे कौतुकही केले. "तिरंदाजीची लीग सुरू होणे हे खेळाच्या लोकप्रियतेची आणि विकासाची साक्ष आहे. आम्ही सर्व तिरंदाज खूप आनंदी आहोत आणि लीगमध्ये दमदार कामगिरीसाठी उत्सुक आहोत," असे दीपिका म्हणाली. तसेच लीग पाहण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे तिने चाहत्यांना आवाहन केले. कम्पाऊंड प्रकाराचा ऑलिम्पिकमध्ये समावेश होणे खूप चांगले आहे.

### कारकीर्दीवर प्रकाशझोत टाकला

सध्या माझे प्रशिक्षण हे तांत्रिक सुधारणा आणि कणखर मानसिकतेभोवती फिरत आहे. या दोन्ही आघाड्यांवर सध्या मी काम करत आहे. तिरंदाजी लीग मला यात सुधारणा करण्यास मदतशीर ठरेल," असेही दीपिकाने सांगितले.घरच्या प्रेक्षकांसमोर खेळताना नेहमीच दडपण असते. मात्र, प्रत्यक्षात हे दडपण खेळाडूंना सर्वोत्तम कामगिरीसाठी प्रेरित करते.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज ™

ePaper

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

। शनिवार।

। दि. 4 ऑक्टोबर 2025।

## शहरात वारंवार घडत आहेत लिफ्ट दुर्घटना

# शहरातील गृहप्रकल्पातील लिफ्टचे सुरक्षा ऑडिट करा!

## :आमदार जगताप : वारंवार होणाऱ्या दुर्घटनांकडे वेधले लक्ष

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**शहरात वारंवार लिफ्ट दुर्घटना घडत आहेत. गृहप्रकल्पांमधील उदवाहन (लिफ्ट) अपघातांबाबत तातडीने कारवाई करण्यात यावी. अशी मागणी आमदार शंकर जगताप यांनी महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाकडे निवेदनाद्वारे केली आहे.**



चोविसावाडी, चऱ्होली येथे २ ऑक्टोबर २०२५ रोजी राम स्मृती सोसायटीमध्ये 11 वर्षांच्या अमेय फडतरे ह्याचा दुर्दैवी मृत्यू लिफ्ट अपघातामुळे झाला. तसेच अनेक वेळा अशा दुर्घटना होत आहेत. त्यामुळे आमदार जगताप यांनी म्हटले की, उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार लिफ्टची नियमित तपासणी न केल्यामुळे सातत्याने प्राणहानी आणि गंभीर अपघात होत आहेत. "वारंवार घडणाऱ्या या अपघातांकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करणे अत्यावश्यक आहे," असे आमदार जगताप यांनी सांगितले.

तसेच या बाबत पुढील उपाययोजना तातडीने राबविण्याची मागणीही जगताप यांनी केली आहे. शहरातील सर्व सोसायट्यांमधील लिफ्टची तपासणी करून प्रमाणित अहवाल सादर करावा. निकृष्ट व अप्रमाणित लिफ्ट त्वरित बंद करून शासनाच्या नियमावलीनुसार कारवाई करावी. नियमांचे पालन न करणाऱ्या बिल्डर, डेव्हलपर व सोसायटी व्यवस्थापनांवर दंडात्मक व कठोर कारवाई करावी. प्रत्येक सोसायटीमध्ये प्रशिक्षित लिफ्टमनची नियुक्ती सक्तीची करावी. लिफ्ट सुरक्षिततेसंबंधी नागरिकांसाठी जनजागृती मोहीम राबवावी.

पिंपरी चिंचवड शहरातील गृहप्रकल्पांतील लिफ्टच्या सुरक्षा ऑडिटसाठी तातडीने कारवाई करावी आणि केलेल्या कार्यवाहीची प्रत त्यांना मिळावी अशी मागणी सुद्धा या निवेदनाच्या माध्यमातून आमदार जगताप यांनी केली आहे. नागरिकांच्या जीविताच्या धोका निर्माण करणाऱ्या या घटनेकडे गांभीर्याने पाहण्याची गरज असल्याने संबंधित विभागांनी तातडीने ठोस व काटेकोर कारवाई करावी, असे आमदार जगताप यांनी म्हटले आहे.

---

## ७० फुटी रावण दहनातून सामाजिक संदेशाचा जागर

## शत्रुघ्न काटे युथ फाउंडेशन आणि जयनाथ काटे सोशल फाउंडेशनचा उपक्रम

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपळे सौदागर येथे दसऱ्यानिमित्त भव्य ७० फुटी रावण दहन सोहळा आणि सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात पार पडला. शत्रुघ्न काटे युथ फाउंडेशन आणि जयनाथ काटे सोशल फाउंडेशनच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात हजारो नागरिकांनी सहभाग घेतला. महाराष्ट्रातील सर्वात मोठा रावण दहन सोहळा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या कार्यक्रमाचे आयोजन गोविंद यशदा चौक, बीआरटी रोड, पिंपळे सौदागर येथे करण्यात आले होते.**



कार्यक्रमाची सुरुवात दिवंगत आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या स्मरणाने झाली.कार्यक्रमाला उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रांत संपर्क प्रमुख मिलिंद देशपांडे, जिल्हा कार्यवाह नरेंद्र पेंडसे, खासदार अमर साबळे, आमदार महेश लांडगे, शंकर जगताप, अमित गोरखे, माजी आमदार अश्विनी जगताप, पवना सहकारी बँकेचे व्हा. चेअरमन जयनाथ काटे उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी झाली. कुणाल मोरे यांच्या डान्स फ्लोर स्टुडिओच्या ग्रुपने सादर केलेल्या नृत्यांनी उपस्थितांची मनं जिंकली. हरियाणातील सुनील अनिल तिलकधारी यांचं "हनुमान" सादरीकरण व "महाकाल" आधारित नृत्य विशेष आकर्षण ठरले.कार्यक्रमात मराठी चित्रपटसृष्टीतील अनेक लोकप्रिय कलाकारांनी रंगत वाढवली. गायक अवधूत गांधी, बिग बॉस फेम जान्हवी किल्लेकर, अभिनेत्री मृण्मयी देशपांडे व अभिज्ञा भावे यांनी सादरीकरण करून प्रेक्षकांची मने जिंकली. कार्यक्रमाची सांगता भव्य रावण दहनाने झाली. ७० फुटी रावणाच्या पुतळ्याचे दहन होताच, उपस्थितांनी 'जय श्रीराम' च्या घोषात विजय साजरा केला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शत्रुघ्न काटे युथ फाउंडेशन आणि जयनाथ काटे सोशल फाउंडेशनच्या सदस्यांनी अथक परिश्रम घेतले. यशस्वी आयोजनाबद्दल नागरिक, पोलीस प्रशासन, वाहतूक विभाग, अग्निशामक दल आणि महापालिका प्रशासनाचे आभार मानण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चेतन अग्रवाल, नीतू अग्रवाल आणि आरजे अक्षय मोरे यांनी केले.

## भाजपा आमदार महेश लांडगे यांची भावना

# देव-देश अन् धर्मासाठी कटिबद्ध समर्पित जगण्याचा संकल्प!

## पिंपरी-चिंचवडमधील विजया दशमी सोहळ्यांत सहभाग

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज




**पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी अधर्मावर धर्माचा, असत्यावर सत्याचा आणि अंधारावर प्रकाशाचा विजय साजरा करणारा विजया दशमी दसरा... आपल्या आयुष्यातील प्रत्येक अडचणीवर मात करण्याची प्रेरणा देतो. रावणासारख्या अहंकाराचा नाश होवो आणि रामासारखा सद्गुण नांदू दे! असा संकल्प आम्ही केला आहे. यावर्षीचा विजया दशमी उत्सव संस्मरणीय ठरला, अशा भावना भाजपा आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केल्या आहेत.**

महेशदादा स्पोर्ट्स फाउंडेशन व शिवांजली सखी मंच यांच्या पुढाकाराने भोसरी येथे नवरात्रोत्सव मोठ्या उत्साहात आणि मंगलमय वातावरणात संपन्न झाला. दहा दिवस विविध धार्मिक व अध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. तसेच, स्त्री-शक्तीचा जागर करण्यात आला. शहरातील सामाजिक, शैक्षणिक, राजकीय तसेच उद्योग-व्यापार क्षेत्रातील मान्यवरांनी आमदार लांडगे यांनी आयोजित केलेल्या दुर्गा उत्सवाला भेट दिली .

विजया दशमी दसऱ्याच्या निमित्ताने शहरातील विविध मंडळे, लोकप्रतिनिधी यांनी आयोजित केलेल्या उत्सवाला आमदार लांडगे यांनी उपस्थिती दर्शवली. भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांच्या पुढाकाराने पिंपळे सौदागर येथे भव्य रावण दहन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. शेकडो जनसमुदायाच्या उपस्थितीत या पारंपारिक सोहळा दिमाखात संपन्न झाला. रावणाच्या प्रतिकृतीचे दहन म्हणजे आपल्यातील वाईट आचार - विचार, अनिष्ट रूढी परंपरा यांचे दहन करण्यात आले.

आमदार लांडगे म्हणाले की, "विजया दशमी दसरा" निमित्त भोसरी विधानसभा मतदार संघासह पिंपरी-चिंचवड शहर आणि परिसरातील विविध सांस्कृतिक, धार्मिक कार्यक्रमांमध्ये सहभागी होता आले. शहराचे मा. महापौर राहुल जाधव यांच्या पुढाकाराने भव्य नवरात्री उत्सव आणि रावण दहन कार्यक्रम झाला. या सोहळ्याला हजारो लोकांनी उपस्थिती दर्शवली.

> "नमस्ते सदा वत्सले मातृभूमे, त्वया हिन्दुभूमे सुखं वर्धितोऽहम्।" जय घोष करीत अनुशासन, शिस्त आणि राष्ट्र प्रेमाला समर्पित भावनेतून मातृभूमीच्या सेवेसाठी समर्पित विश्वातील सर्वात मोठी स्वयंसेवी संघटना राष्ट्रीय स्वयंसेवक संघ शंभर वर्षे पूर्ण करत आहे. राष्ट्रभक्तीच्या संस्कारांनी लाखो स्वयंसेवकांना घडवून, निस्वार्थ समाजसेवेच्या माध्यमातून राष्ट्र आणि समाजाच्या उन्नतीसाठी अखंड कार्यरत असणाऱ्या या मातृसंस्थेला त्रिवार अभिवादन करता आले. त्यामुळे यावर्षीचा विजया दशमी उत्सव माझ्यासाठी खास होता.
> **- महेश लांडगे,** आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

टाळगाव चिखली, जाधववाडी येथील रामायण मैदानातील हा सोहळा संस्मरणीय ठरला. निगडी येथे क्रांतिवीर मित्र मंडळ ट्रस्ट आणि मा. नगरसेवक प्रा. उत्तम केंदळे यांच्या पुढाकाराने विजया दशमी दसऱ्यानिमित्त रावण दहळ सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. परिसरातील नागरिकांनी या सोहळ्याला उत्स्फूर्त सहभाग घेतला. तसेच, जबळ मैदान नेवाळेवस्ती, चिखली या ठिकाणी चांगभलं प्रतिष्ठान आणि सागर थोरात यांच्या पुढाकाराने औरंगजेबरुपी रावण दहन सोहळा उत्साहात संपन्न झाला. यानिमित्त मर्दानी खेळ, महाराष्ट्राची लोकपरंपरा नृत्य, छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावरील पोवाडे आणि ढोल-ताशांचा निनाद अशा कार्यक्रमाने परिसरातील नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. चिखली येथील मा. नगरसेविका साधना मळेकर आणि शिवगर्जना प्रतिष्ठाण यांच्या वतीने आयोजित भव्य रावण दहन सोहळा उत्साहात संपन्न झाला.

---

# मराठी संस्कृती, साहित्य आणि अस्मितेचा जागर!

## शाळकरी विद्यार्थ्यांसह अबालवृद्धांचा सहभाग

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**टाळ-मृदुंगाचा निनाद... लेझीम-ढोलताशांचा गजर... आणि 'ज्ञानोबा-तुकाराम'चा जयघोष... अशा संस्कृतीच्या सुवर्ण धाग्यांनी गुंफलेली मराठी भाषेची गौरवमयी ग्रंथदिंडी जणू अक्षरांच्या रथावरून मार्गक्रमण करीत आज चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे पोहोचली. अभिजात परंपरेचा अभिमान, साहित्यसंपदेचे वैभव आणि समाजजीवनाचा उत्सव एकवटून आलेल्या या ग्रंथदिंडीने पिंपरी चिंचवडच्या रस्त्यांवर मराठी अस्मितेचा जागर केला. शाळकरी विद्यार्थ्यांसह अबालवृद्धांचा सहभाग असणारी ही ग्रंथदिंडी मोरया गोसावी मंदिर, गांधी पेठ, चाफेकर चौक मार्गे प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे आल्यानंतर तिचे जोरदार स्वागत करण्यात आले.**

पिंपरी चिंचवड महापालिका आयोजित तसेच अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पिंपरी चिंचवड शाखा व महाराष्ट्र साहित्य परिषद पिंपरी चिंचवड शाखा यांच्या सहकार्याने आणि महानगरपालिकेचे श्री. भैरवनाथ सार्वजनिक ग्रंथालय, भोसरी व हुतात्मा चाफेकर सार्वजनिक ग्रंथालय, चिंचवड यांच्या सहभागातून ३ ऑक्टोबर २०२५ रोजी 'अभिजात मराठी भाषा दिवस' तसेच ३ ऑक्टोबर ते ९ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत 'अभिजात मराठी भाषा सप्ताह' साजरा करण्यात येत आहे. या महोत्सवानिमित्त आज मोरया गोसावी मंदिर ते प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह या मार्गावर पारंपरिक उत्साहात ग्रंथदिंडीचे आयोजन करण्यात आले होते. मराठीच्या वैभवशाली परंपरेचे दर्शन घडविणारी ही ग्रंथदिंडी साहित्य आणि मराठी संस्कृतीचा आविष्कार ठरली.,आमदार अमित गोरखे, महापालिका अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, विशेष अधिकारी तथा मराठी भाषा समन्वय अधिकारी किरण गायकवाड, औद्योगिक प्रशिक्षण संस्था प्राचार्य शशिकांत पाटील, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पिंपरी चिंचवड शाखा अध्यक्ष भाऊसाहेब भोईर, महाराष्ट्र साहित्य परिषद पिंपरी चिंचवड शाखा अध्यक्ष राजन लाखे



यांच्यासह महापालिकेच्या विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी, विविध संस्थांचे प्रतिनिधी, शाळकरी विद्यार्थी यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. संत साहित्य, भारतीय संविधान, मराठी भाषेतील अभिजात साहित्यकृती, चरित्रग्रंथ, काव्यग्रंथ यांचा समावेश असलेली पालखी ग्रंथदिंडीमध्ये होती. महाराष्ट्राच्या परंपरेशी सुसंगत असा पोशाख यावेळी दिंडीमध्ये सहभागी झालेल्यांनी परिधान केला होता.


College of Pharmacy
Saswad, Pune - 412301
D.Pharm/B.Pharm/M.Pharm/Ph.D.
PDEA
Pharmacy Council of India
SPPU Affiliation
NAAC
NAAC Accreditation
Maharashtra State Board of Technical Education
Facilitation & Verification Center for
F. Y. B.Pharm, F.Y.M.Pharm,and
Direct S.Y.B.Pharm Admission 2025–26
Admission Schedule for
F.Y.B.Pharm
Online Registration & Document Upload
07 – 21July 2025 (10:00AM-5:00PM)
Document Verification & Form Confirmation (Physical Scrutiny at FC)
08 – 22 July 2025 (10:00AM-5:00 PM)
Display of Provisional Merit List
25 July 2025
Grievance Submission (Online / at FC)
26– 28 July 2025 (10:00AM-5:00 PM)
Final Merit List
31 July 2025
Your Trusted Facilitation Centre!
FC Code 6372
Important Note:
• Bring all original + Xerox copies of documents
• Late registrations after 14 July are for Non-CAP seats only
"Your First Step Towards a Bright Pharmacy Career!"
Confirm
Visit Us for Physical Scrutiny
PDEA's Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy, Saswad


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046